# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**
**सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**सोमवार, दिनांक २९ जून, २०२६**

## महिला व बालविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एक्स-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३६, पोषण आहार**<br>**बाब क्रमांक: ३१६, रूपये:- १७,३४,९२,७३,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | १६२८ | १० | साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील अंगणवाडी केंद्रामार्फत लहान बालकांसाठी दिली जाणारी ‘‘काळजी पेटी “ (बाल संगोपन साहित्य किट) अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी पालकांकडून प्राप्त होत असणे, पेटीमध्ये असलेली खेळणी,शैक्षणिक साहित्य, स्वच्छता साहित्य, कपडे किंवा पोषणपूरक वस्तू या दर्जाहीन असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (२) | १६४८ | १०० | वाळवा तालुक्यातील उरुण-ईश्वरपूर नगरपालिका हद्दीत ६५ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असूनही, लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक असणाऱ्या किमान ६० अंगणवाड्यांऐवजी सध्या केवळ ४ अंगणवाड्या कार्यरत आहेत. अशीच परिस्थिती आष्टा शहरात देखील आहे. परिणामी, शहरातील गोरगरीब कुटुंबांतील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि ३ वर्षांखालील बालके शासनाच्या पोषण आहारासह विविध कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत आहेत. यासाठी शासनाने त्वरित अंगणवाडी मंजूर करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | १६५६ | १० | सन २०२३ पासून सप्टेंबर २०२५ या अडीच वर्षांच्या काळात पाच वर्षांखालील एकूण ३४ हजार ३२५ बालकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी धक्कादायक उघडकीस आली असणे, तसेच धारणी व चिखरलदरा या दोन तालुक्यात एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ या आठ महिन्यांत १०७ बालमृत्यू तर मेळघाट येथे जुलै ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान ७७ बालकांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले असणे, कुपोषण तसेच बालमृत्यूंच्या समस्येवर काम करण्यासाठी आवश्यक असलेले बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची अर्ध्याहून अधिक पदे रिक्त असणे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ५५३ अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून, त्यापैकी ३३५ पदे रिक्त असणे, तर मुख्य सेविकांच्या ३८९९ पदांपैकी १३६४ पदे रिक्त असणे. अंगणवाडी सेविका |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आणि मदतनीसांच्या एक लाख १०, ६६४ पदांपैकी अनुक्रमे १०८३ आणि ४०५९ पदे रिक्त असून, ती भरली जात नसणे, कुपोषण दूर करण्यासाठी सातत्याने मागणी होत असतानाही सरकारकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे जनमानसात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ जून, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महिला व बालविकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई